# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक २२.०१.२०२३

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. २१/०१/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ९५ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ५१,०५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. २१/०१/२०२३ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०३ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन २३.९४ लिटर दारू असा एकुण ६२,९८०/—रू.किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द दि. २१/०१/२०२३ रोजी जुगार कायद्या अंतर्गत जिल्हयात एकुण ०१ ठिकाणी छापा टाकुन आरोपी विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण ६२०/—रूपये जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**मरणास कारणीभुत असणा—या विरूध्द अपघाताचे दाखल गुन्हे:—**

दि. २१/०१/२०२३ रोजी पोस्टे बाळापुर येथे कलम २७९,३०४(अ), ३३८,३३७ भादवी अन्वये गुन्हा दाखल असुन यातील मोटार सायकल क्र एमएच १२ एजे २०६५ हिरो होंडा सीबीझेड या गाडीवरून जात असतांना समोरून रॉग साईडने येणारे लक्झरी वाहन क्र एमएच १२ के क्यु ३५६१ च्या चालकाने आपले ताब्यातील लक्झरी वाहन भरधाव वेगात व निष्काळजी व हलगर्जीपणाने चालवुन समोरून धडक दिल्याने गजानन लोमटे याचे मरणास कारणीभुत झाला व शेख सलीम शेख ख्वाजा यास गंभीर जख्मी केले म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.

**दुखापत:—**

दि. २१/०१/२०२३ रोजी पोस्टे बासंबा, हटटा, नर्सी नामदेव येथे प्रत्येकी ०१ असे एकुण ०३ गुन्हे कलम ३२४ व ईतर भादवी कलमान्वये गुन्हे दाखल असुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.

**अपघात दाखल गुन्हे:—**

दि.२१/०१/२०२३ रोजी पोस्टे कळमनुरी येथे ०१ अपघाताचे गुन्हे कलम २७९,३३८ भादवी प्रमाणे दाखल होवुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.